# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

सेंट्रल प्रोव्हिन्सेस शासन, शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगष्ट, १९२३ व्दारा स्थापित, व
महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ'

## महाविद्यालय विकास विभाग

छत्रपति शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रविंद्रनाथ टागोर मार्ग, नागपुर–४४० ००१ दुरध्वनी क्रमांक २५२९९३२ २५२२३९०


क्र.म.वि./ ०८ दिनांक : ०१/०३/२०१८

प्रति,

अध्यक्ष/सचिव/प्राचार्य,

संबंधीत संलग्नित महाविद्यालय,

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

विषय :–सत्र २०१८–१९ च्या निरंतर संलग्निकरणाकरिता गठीत स्थानिय चौकशी समितीची भेट निश्चित करण्याकरिता मुदत वाढ देण्याबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, आपण सादर केलेल्या प्रस्तावानुसार आपल्या महाविद्यालयात सुरू असलेल्या अभ्यासक्रमांचा निरंतर संलग्निकरण काळ सत्र २०१८–१९ पासुन पुढे वाढविण्यासाठी विद्यापीठाव्दारे स्थानीय चौकशी समिती गठीत करण्यात आली आहे. विद्यापीठव्दारे निर्गमित निर्देश क्र. ८२/२०१६ मधील तरतुदीनुसार प्रत्येक महाविद्यालयाच्या निरंतर संलग्किरणाची प्रक्रिया ही शैक्षणिक सत्र सुरू होण्यापुर्वी पुर्ण करून चालु सत्रात महाविद्यालयाला निरंतर संलग्निकरण आहे किंवा नाही तसेच सदर सत्रात विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावयाचे आहे किंवा नाही याबाबतच्या सुचना सर्व संलग्नित महाविद्यालयांना शैक्षणिक सत्र सुरू होण्यापुर्वी विद्यापीठाला देणे गरजेचे आहे. विद्यापीठद्वारे निश्चित करण्यात आलेले वेळापत्रकाचे परिपत्रक दिनांक १४.०९.२०१७ रोजी सर्व संलग्नित महाविद्यालयांना ऑनलाईन पाठविण्यात आले आहे. त्याप्रमाणे प्रत्येक महाविद्यालयाने शैक्षणिक सत्र सुरू होण्यापुर्वी स्थानीय चौकशी समित्यांच्या भेटी <u>दिनांक १५.०१.२०१८ पर्यंत</u> करून त्यांचे अहवाल विद्यापीठात वेळीच सादर होणे गरजेचे होते. परंतु ब–याच महाविद्यालयांनी उपरोक्त तारखेपर्यंत भेट निश्चित केली नसल्यामुळे मा. कुलगुरूंच्या आदेशान्वये दिनांक २०.०१.२०१८ रोजीच्या पत्रान्वये भेटीची तारीख दिनांक १० फेब्रुवारी, २०१८ पर्यंत वाढविण्यात आल्याचे संबंधीत महाविद्यालयांना कळविण्यात आले होते. परंतु या कालावधीपर्यंत सुध्दा काही महाविद्यालयांनी स्थानिय चौकशी समितीची भेट निश्चित करून अहवाल सादर केले नाहीत.

करिता आपणास पुनःश्च **<u>शेवटची अंतीम संधी</u>** म्हणुन कळविण्यात येते की, ज्या महाविद्यालयांनी अद्याप स्थानिय चौकशी समित्याच्या भेटी निश्चित केलेल्या नाहीत अशा भेटी न झालेल्या महाविद्यालयांकरिता <u>शेवटची अंतीम संधी</u> म्हणुन भेटीची तारीख दिनांक १० मार्च, २०१८ पर्यंत वाढविण्यात येत आहे. तरी अशा भेटी न झालेल्या महाविद्यालयांनी स्थानिय चौकशी समितीचे अध्यक्ष व सदस्यांशी त्वरीत संपर्क करून समितीची भेट निश्चित करावी ज्या महाविद्यालयांच्या समित्यांच्या भेटी <u>दिनांक १० मार्च, २०१८ पर्यंत</u> होणार नाही अशा महाविद्यालयांचे शैक्षणिक <u>सत्र २०१८–१९ चे प्रवेश गोठविण्यात येईल</u> व त्यानंतर महाविद्यालयाच्या कोणत्याही निवेदनांवर विचार केला जाणार नाही याची वेळीच नोंद घ्यावी.

कळावे.

<u>टिप:– समितीच्या भेटीपुर्वी महाविद्यालयांनी स्थानिय चौकशी समिती पुर्व माहीती(**Pre LEC**) अद्यावत करावी.</u>

आपला,

(प्रदीप बिनीवाले)
उपकुलसचिव(म.वि.)
(अति.कार्य.)